नि.दि. दावा २८/२०२१.
राज वखनुर +२ वि. अरविंद +१.
निशाणी क्र.३१ वरुन पुढे...

<u>प्रतिवादींतर्फे सा.क.१ यांचा उलट तपास शपथेवर सुरु</u>.
<u>वादींतर्फे विधीज्ञ श्री. एन.एम. जुनघरे</u>.

माझे नाव : अरविंद विठ्ठल वखनोर.
वय सुमारे : ४९ वर्ष, व्यवसाय : शेती.
राहणार : बोटोणी, ता. राळेगांव, जि. यवतमाळ.

१. हे म्हणणे खरे आहे की वादी क्र.३ ही माझ्या मयत भाऊ मिलींद याची विधवा आहे. हे म्हणणे खरे आहे की वादी क्र.१ व २ हे वादी क्र.३ ची मुले आहेत. माझा मयत भाऊ मिलींद हा सन २०११ मधे मरण पावला. हे म्हणणे खरे आहे की मयत मिलींद याला वादींशिवाय इतर कोणतेही वारस नाही. मयत मिलींद हा माझ्यापेक्षा लहान होता. हे म्हणणे खरे आहे की मी आणि मयत मिलींद आम्ही दोघे भाऊआणि प्रतिवादी क्र.२ शितल ही आमची बहीण आहे. आमचे वडिल विठ्ठलराव वखनोर हे वर्ष २००७ मधे मरण पावले. आमची आई वर्ष २०१६ मधे मरण पावली. हे म्हणणे खरे आहे की आमच्या वडीलाला आम्ही दोघे भाऊ आणि एक बहीण यांच्याव्यतिरिक्त इतर कोणतेही वारस नाही.

२. हे म्हणणे खरे नाही की माझा मयत भाऊ मिलींद हा पुर्वी वरोरा येथे रहात होता.

प्रश्न – सर्व वादी हे देखील मौजा वरोरा येथे राहतात?

उत्तर – मिलींद मरण पावल्यानंतर राहतात.

३. हे म्हणणे खरे आहे की वादी क्र.३ ही मुस्लीम समाजाची आहे. हे म्हणणे खरे आहे की तिच्या वडीलांचे नाव रहमान शहा असे आहे. हे म्हणणे खरे आहे की रहमान शहा हे वरोरा येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की माझा भाऊ मिलींद आणि वादी क्र.३ यांचा प्रेमविवाह झाला होता. हे म्हणणे खरे आहे की माझे वडिल विठ्ठलराव वखनोर हे मारेगांव येथे कम्युनीस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते.

हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांची व आमच्या कुटुंबाची उपजिवीका ही शेतीवरच चालत होती. माझ्या वडीलांच्या नावाने एकूण तीस ते पस्तीस एकर शेती होती. हे म्हणणे खरे नाही की बोटोणी येथील घर मालमत्ता क्र.२५६ ही सुद्धा माझ्या वडीलांच्या नावाने होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की ती घरमालमत्ता माझे वडिल आणि त्यांचे भाऊ यांच्या सामायीक नावाने होती.

४. हे म्हणणे खरे आहे की मौजा बुरांडा येथील वाद शेती ही माझ्या वडीलांच्या नावाने होती.

प्रश्न – ती शेती आता कोणाच्या नावाने आहे?

उत्तर – वडिल मरण पावल्यानंतर आईच्या नावाने झाली आणि आई जिवंत असतांना वाटणीपत्रात माझ्या हिश्यात मिळाली.

५. वाद शेती ही सन २००९ पासून माझ्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की सन २००९ पासून वाद शेतीतून जे काही उत्पन्न निघाले ते मीच ठेवले आहे. हे म्हणणे खरे आहे की वाद शेतामधील कोणतेही क्षेत्र वादींच्या ताब्यामधे नाही.

**वादींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

समक्ष

Digitally signed by KAILAS PARASRAM DAWANE
Date: 2025.06.24 13:14:11 +0530

(के.पी. दवने)

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

मारेगाव.

मारेगाव.

दि.२४.०६.२०२५.